दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले


बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार ०३ नोव्हेंबर २०२५ | अंक ३०९ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# नराधमांनी सातवीतील मुलीचे तोडले लचके, सामूहिक बलात्काराने देश हादरला

## बलात्कारानंतर धमकी

**पोलीस अधिकाऱ्याने या घटनेबाबत सविस्तर माहिती देताना सांगितले की, मुलीला जबरदस्तीने ई-रिक्षात बसवून काही अंतरावर नेत तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आला. नंतर तिन्ही आरोपींनी तिला घडलेल्या घटनेबाबत कोणालाही माहिती न देण्याबाबत धमकी दिली आणि त्यानंतर तिले जाऊ दिले. आता हे प्रकरण समोर आल्यानंतर मुलीला वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.**

देशातील गुन्हेगारीच्या घटना थांबायला तयार नाहीत. आता पश्चिम बंगालमधून आणखी एक सामूहिक बलात्काराची घटना समोर आली आहे. राजधानी कोलकात्यातील दम दम परिसरात एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्यात आला आहे. नराधमांनी सातवीत शिकणाऱ्या मुलीवर सामूहिक बलात्कार केला आहे. या प्रकरणी 3 तरुणांना अटक करण्यात आली आहे. शनिवारी संध्याकाळी ही घटना घडली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. पश्चिम बंगालची राजधानी कोलकात्यातील दम दम परिसरात शनिवारी ही घटना घडली आहे. एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने याबाबत माहिती देताना म्हटले की, शनिवारी पीडित विद्यार्थिनी ट्यूशनवरून घरी परतत होती. त्यावेळी एका आरोपीने तिला पार्कमध्ये नेले. त्यानंतर तिथे आणखी दोन पुरुषही आले. त्यांनी तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. आता याप्रकरणी 3 जणांना अटक करण्यात आलेली आहे. भाजपकडून कठोर कारवाईची मागणी



कोलकात्यातील या घटनेनंतर तिन्ही आरोपींविरुद्ध POCSO कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच त्यांना शनिवारी रात्री दम दम परिसरातून अटक करण्यात आली आहे. या घटनेनंतर भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आज दमदम पोलिस ठाण्याबाहेर जोरदार निदर्शने केली आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. आता पोलीसांनी या घटनेच्या सखोल तपासाला सुरुवात केली आहे. याआधी पश्चिम बंगालमधील दुर्गापूर येथे वैद्यकीय विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार झाला होता. ही विद्यार्थीनी खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएसच्या दुसऱ्या वर्षात शिकत होती. या ही तरूणी बाहेर जेवायला गेली होती त्यावेळी कॉलेज कॅम्पसजवळ सामूहिक बलात्कार झाला होता. याप्रकरणी 3 आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांची सखोल चौकशी सुरु आहे.

## आंबासाखर कारखाण्याचा गळीत हंगामाच्या शुभारंभ प्रसंगी उपस्थित रहा-रमेशरावजी आडसकर

अंबाजोगाई : प्रतिनिधी केज-अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेल्या अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ दि.०३ नोव्हेंबर २०२५ सोमवार रोजी सकाळी दहा वाजता ह.भ.प.भगवान महाराज वरपगांवकर यांच्या शुभहस्ते होणार असून या प्रसंगी प्रमुख उपस्थितीमध्ये चेअरमन अंबा साखर कारखाना,लि.अंबाजोगाईचे



चेअरमन तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रमेशरावजी आडसकर,व्हाइस चेअरमन दत्ता पाटील, संचालक राजेभाऊ औताडे उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमासाठी ऊस उत्पादक शेतकरी,सभासद,बिगर सभासद,ऊस तोडणी वहातुक,हार्वेष्टर चालक,मालक,शेतकरी या सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन रमेशराव आडसकर यांनी केले आहे.

## शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात ; मदत मिळणार तरी कधी ? दत्ता वाकसे

# सरकार विरुध्द बळीराजाची तीव्र नाराजी

वडवणी : प्रतिनिधी तालुक्यात खरीप हंगामात निसर्गाची अवकृपा झाली असून दिवाळीपूर्वी आर्थिक मदत देण्याची घोषणा राज्य सरकारने केली होती,मात्र अद्याप नुकसानीचे अनुदान काही शेतकऱ्यांना पडले तर काही नाही नियोजन नसल्याने बळीराजांची दिवाळी अंधारात गेली.आता दिवाळील नंतर तरीमदत मिळणार काय ? असा प्रश्न मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी उपस्थित केला. यावर्षीच्या खरीप हंगामात सततच व



अतिवृष्टीचा पाऊस व हुमणी अळी आणि विविध रोगांच्या प्रादुर्भावाने सोयाबीन कापूस तूर व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. ऑगस्ट,सप्टेंबर महिन्यात ढग सदृश्य अतिवृष्टीने कहर केल्याने नदी नाल्या काठच्या शेतामधील पिके उध्वस्त झालेली आहेत. अशात शासनाने १८,५०० रुपये २ हेक्टर पर्यंत भरपाई मर्यादा ठेवत नुकसान दिवाळीपूर्वी देण्याचे वाजागाजा करून जाहीर केले. परंतु १८,५०० पैकी ८५०० रुपये पेक्षा कमी तुटपुंजी अल्प मदत बोटावर मोजण्या इतपत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली आहे.आज उद्या सरकारची मदत खात्यात जमा होईल, या प्रतीक्षेत असलेले शेतकरी दिवाळी होऊन आठवडा झाला तरी त्यांच्या खात्यात जमा न झाल्याने सरकार विरोधात संताप व्यक्त करीत आहेत. अतिवृष्टीचे संकट डोक्यावर असतानाच आता खरीप हंगामातील पिके काढणीला आली असताना व काही शेतकऱ्यांच्या रब्बी हंगामाची पेरणी झाली असताना परतीच्या अवकाळी मुसळधार पावसाने बरसायला सुरुवात केली आहे. यामुळे नैसर्गिक संकटाच्या सावटात सापडले आहे.

## एम - सॅण्ड धोरणामुळे बीड जिल्ह्यात बांधकाम क्षेत्राला नवा श्वास : महाखनिज पोर्टलवर अर्ज करा - प्रशासनाचे आवाहन

.राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने अंमलात आणलेल्या एम - सॅण्ड ( कृत्रिम वाळू ) धोरणामुळे बीड जिल्ह्यातील बांधकाम , विकासकामे आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हा प्रशासनाने या धोरणाची अंमलबजावणी जलद गतीने सुरू केली असून , जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून एकूण ८१ प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आले आहेत . या पैकी ७३ प्रस्तावांना शासनाची मान्यता मिळाली असून , उर्वरित काही प्रस्तावांचा तांत्रिक अभ्यास सुरू आहे . हे सर्व प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या “गौण खनिज उत्खनन व विकास नियम २०१३” अंतर्गत कार्यवाहीस पात्र ठरले आहेत .

एम - सॅण्ड म्हणजे कृत्रिम वाळू — नैसर्गिक वाळूच्या पर्याय म्हणून तयार केलेली खनिज सामग्री . दगडांच्या प्रक्रियेमधून , विशिष्ट यंत्रणेद्वारे तयार केलेली ही वाळू बांधकामासाठी अत्यंत उपयुक्त , दर्जेदार आणि पर्यावरणपूरक मानली जाते . पूर्वी नैसर्गिक वाळूवर अवलंबून असलेले बांधकाम क्षेत्र आता एम - सॅण्डमुळे स्वावलंबी होत आहे . महाराष्ट्र शासनाने या क्षेत्रात पारदर्शकता आणि जबाबदार उत्खनन यासाठी हे धोरण लागू केले आहे . एम - सॅण्डचे अनेक फायदे आहेत . नद्यांमधून होणारे अनियंत्रित उत्खनन थांबते आणि पर्यावरणाचे संतुलन राखले जाते . बांधकामासाठी हा दर्जेदार पर्याय आहे , कारण एम - सॅण्डची गुणवत्ता स्थिर असते आणि त्यात माती , सेंद्रिय घटक नसतात . त्यामुळे काँक्रीट अधिक मजबूत बनतो . स्थानिक स्तरावर उत्पादन होऊ शकते म्हणून वाहतूक खर्च कमी होतो आणि दर नियंत्रणात राहतात . ग्रामीण भागात थेट व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होते आणि शासनाला नियमित महसूल मिळतो .

जिल्हा गौण खनिज अधिकारी व तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी यांनी सांगितले की , “ एम - सॅण्ड प्रकल्पांमुळे बांधकाम उद्योगाला वाळूचा पर्याय उपलब्ध होत आहे . अवैध उत्खननावर नियंत्रण आणणे आणि वैध व्यवसायाला प्रोत्साहन देणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे . ”

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिलेल्या माहितीनुसार , जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून प्रस्ताव सादर झाले असून , त्यापैकी बहुतांश मंजूर झाले आहेत . शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार परवानग्या , पर्यावरणीय मान्यता आणि सुरक्षा उपाययोजना पूर्ण करून हे प्रकल्प लवकरच सुरू होणार आहेत . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनीही संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत की , प्रत्येक प्रकल्पाच्या कामकाजात पारदर्शकता , पर्यावरणीय तपासणी आणि स्थानिक ग्रामसभेची संमती यावर भर द्यावा .

छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी एम - सॅण्ड धोरण हे विकास व पर्यावरण यांचा समतोल राखणारे धोरण आहे असे आवाहन केले आहे . विभागातील सर्व जिल्ह्यांनी या संधीचा उपयोग करून स्थानिक संसाधनांवर आधारित अर्थव्यवस्था उभी करावी , असे म्हटले आहे .महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील सर्व जिल्हा प्रशासनांना निर्देश दिले आहेत की , एम - सॅण्ड प्रकल्पांना प्राधान्य देऊन पारदर्शक खनिज व्यवस्थापन सुनिश्चित करावे . अवैध वाळू उत्खननावर नियंत्रण आणण्यासाठी ही धोरणात्मक दिशा महत्त्वाची ठरेल .

बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी सांगितले की , “ एम - सॅण्ड प्रकल्पांमुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील . गावपातळीवरील तरुणांना तांत्रिक प्रशिक्षण देऊन त्यांना उद्योगाशी जोडले जाणार आहे . ” तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी म्हटलं की , “ शासनाच्या एम - सॅण्ड धोरणामुळे बांधकाम क्षेत्राला किफायतशीर आणि उपलब्ध वाळू मिळेल . तसेच पर्यावरणीय संरक्षण आणि महसूल वाढ या दोन्ही बाबी साध्य होतील . ”

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले की , “ एम - सॅण्ड प्रकल्पांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता ठेवून नागरिकांचा विश्वास संपादन करणे हेच आमचे ध्येय आहे . शासनाने केलेल्या या उपक्रमामुळे बीड जिल्हा खनिज व्यवस्थापनात आदर्श ठरेल . ”

एम - सॅण्ड धोरण हे केवळ बांधकाम क्षेत्रासाठी नव्हे , तर पर्यावरण , रोजगार आणि महसूल व्यवस्थापनासाठीही एक दूरदृष्टीचा निर्णय आहे . बीड जिल्हा प्रशासनाने या धोरणाची यशस्वी अंमलबजावणी करून “ हरित विकास आणि पारदर्शक प्रशासन ” या दिशेने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे .

## ज्योती तिबोले यांची विद्युत सहायक पदी निवड



धारूर येथील ज्योती ज्योतिबा तिबोले यांनी जून २०२५ मध्ये घेतलेल्या महावितरण कंपनीच्या विद्युत सहाय्यक पदाच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, त्यामध्ये ज्योती तिबोले यांची रत्नागिरी येथे विद्युत सहाय्यक पदासाठी निवड झाली आहे. ज्योती तिबोले यांच्या या यशामुळे धारूर शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. जय अर्जुन (बप्पा) गायकवाड यांच्याकडून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. अभ्यास, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर ग्रामीण भागातील युवक-युवतीसाठी प्रेरणादायी ठरेल असे हे यश आहे. ज्योती तिबोले यांनी आपल्या यशाचे श्रेय कुटुंबीयांच्या पाठिंब्याला, शिक्षकांच्या मार्गदर्शनाला आणि स्वतःच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना दिले आहे. त्यांच्या भावी कार्यासाठी जय धारूरकरांनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

## माजलगाव तालुक्यातील जिल्हा परिषद सादोळा गटातून अनेक इच्छुकांची धावपळ



प्रतिनिधी माजलगाव तालुक्यातील जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण यासाठी अनेक कार्यकर्त्यांची रस्सीखेच सुरूच यासाठी गटातील सर्व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन चर्चा केली जो दादा पैलवान फडामध्ये उतरवितेन त्याला पाठिंबा पण ते पैलवान आपल्या गटातला असावे असा पण नमूद केलं या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे दीपक साळवे,विलास साळवे,व सावने साहेब,शिनगारे ,खंडू कांबळे,अंसाराम वानखेडे,महेमूद पटेल, फेरोज पठाण या सर्व राष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी बैठक घेऊन चर्चा केली सर्व एकत्र गावात जाऊन मदराशी स्वाद साधला व गावात जाऊन भेटी सुद्धा केले पुढील आदरणीय दादा ठरवतील तेच उमेदवार अशा चर्चा केल्या पण ते उमेदवार आपल्या गटातला असावा प्रामाणिक दादांचा काम केलेला उमेदवार असावा आदरणीय दादा ने जो प्रमाणिक दादाचा काम केलेला आहे असे व्यक्तींना उमेदवारी जाहीर करावी असं जनतेतून व्यक्त होत आहे

# चकलांबा पोलीस ठाण्याच्या पाच किमी अंतरावर गांजाची शेती

### स्थानिक गुन्हे शाखेची दबंग कारवाई ; संदीप पाटील तुम्ही कारवाई का केली नाही ?

उमापूर / प्रतिनिधी चकलांबा पोलीस ठाण्याच्या पाच किमी अंतरावरील शेतात गांजाची पीके उभी असतानाही चकलांबा पोलिसांना याची थोडीही खबर का लागली नसावी ? चक्क एवढ्या मोठ्या प्रमाणात गांजाची शेती होत असतानाही चकलांबा पोलिसांची चुप्पी का होती ? त्यांना हे दिसले नाही का ? स्थानीक गुन्हे शाखेला येऊन कारवाई का करावी लागली ? असे अनेक प्रश्न चकलांबा पोलिसांच्या कार्यक्षमतेवर उपस्थित होत आहेत.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी जिल्हयातील सर्वच प्रकारचे अवैध धंद्यावर कारवाई करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड. यांना आदेश दिलेले आहे. त्याअनुषंगाने दि. १ नोव्हेंबर रोजी पोनि. शिवाजी बंटेवाड यांना गोपनिय माहिती



मिळाली की, मौजे धुमेगाव शिवारातील पिराचे शेतात नारायण मगर याने त्याचे आर्थीक फायद्यासाठी बेकादेशीररित्या अंमली पदार्थ गांजाच्या झाडाची लागवड केलेली आहे. त्यावरून ही माहिती पोलीस अधीक्षक, बीड व उपविभागीय पोलीस अधिकारी गेवराई यांना कळवुन त्यांनी कारवाई करण्याचे आदेश दिल्याने पो.नि. शिवाजी बंटेवाड व प्रभारी अधिकारी पो.स्टे. चकलांबा यांचे संयुक्त पथक मौजे धुमेगाव शिवारातील पिराचे शेताजवळ गांजाची लागवड केलेल्या नारायण मगर यांचे शेतामध्ये छापा टाकला असता कापसाच्या पिकाच्या शेतामध्ये अंतरावर गांजाच्या झाडाची लागवड केल्याचे दिसुन आले. शेत मालक नारायण शेषेराव मगर (वय ४४ वर्षे व्य. शेती, रा. धुमेगाव ता. गेवराई) यांना विचारपुस केली असता त्याने सदर गांजाचे झाडे लागवड केल्याचे सांगितले. तसेच सदर शेताचे शेजारी असलेल्या परिसराची पाहणी केली असता तेथे आरोपी सुरेश सर्जेराव मगर याचे शेतात देखील गांजाची झाडे मिळून आली. त्यावरुन सदर दोन्ही शेतातील सर्व गांजाचे झांडाचा सविस्तर पंचनामा करुन आरोपी नारायण शेषेराव मगर याचे गट क्र. १९० मध्ये ४४ गांजाची झाडे वजन १५३.१५ ग्राम कि. अं.४२,८८,२००/- व आरोपी नामे सुरेश सर्जेराव मगर याचे मालकीचे शेतामध्ये १३१ गांजाची झाडे वजन ३३७.५५ ग्राम कि.अं. ९४,५१,४००/- असा एकुण ४९०.७० किलो ग्राम गांजा वजनाचा १,३७,३९,६००/ रु अंमली पदार्थ गांजाचा मुद्देमाल मिळुन आला. आरोपी नारायण शेषेराव मगर रा. धुमेगाव ता. गेवराई याला ताब्यात घेण्यात आले असून दोन आरोपी विरुध्द पो.स्टे. चकलंबा गुरनं ३७६/२०२५ कलम ८ (ल), २० (ल), २० (ल) (ळ), २० (ल) (ळळ) गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

सोमवार ०३ नोव्हेंबर २०२५
https://lokaarambh.com



# बालकांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा विषयक एक दिवसीय प्रशिक्षण संपन्न

बीड(प्रतिनिधी)–होम फॉर द चिल्ड्रन फाउंडेशन मु ंबई,जिल्हा विधीसेवा प्राधिकरण बीड,जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय बीड राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस अधीक्षक कार्यालय बीड येथे पोलीस अधीक्षक नवनीत कावत व अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली बाल कल्याण पोलिस अधिकारी यांना बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ तसेच लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण (POCSO) अधिनियम, २०१२ संदर्भातील प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पल्लवी जाधव,मनीषा तोकले, छाया गडगे सदस्य बालकल्याण समिती बीड, तत्वशिल कांबळे आदी उपस्थित होते प्रमुख मार्गदर्शक म्हणून परम आनंद, वसीम शेख, सचिन करंजुले तत्वशिल कांबळे हे उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक तत्त्वशील कांबळे यांनी केले यावेळी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की काळजी व संरक्षणाची बालके,विधी संघर्ष ग्रस्त बालके हरवलेली सापडलेली बालके, बाल लैंगिक अत्याचार, बालकामगार बालविवाह अशा बालकांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे त्यामुळे या प्रशिक्षणाचा अधिकारी व कर्मचारी यांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे असे सांगितले. या प्रशिक्षणामध्ये वसीम शेख यांनी विधी संघर्षग्रस्त बालकांच्या संदर्भातील प्रक्रिया याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. परम आनंद यांनी काळजी व संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकांबाबतच्या प्रक्रिया स्पष्ट केल्या, तर सचिन करंजुळे यांनी झजउडज कायद्याविषयी महत्त्वपूर्ण माहिती दिली. या प्रशिक्षण सत्रामुळे बालकल्याण पोलिस अधिकाऱ्यांना बाल संरक्षणाशी संबंधित कायदेशीर बाबींची सखोल समज प्राप्त झाली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पल्लवी जाधव यांनी केले

## संपादकीय

### लोणचं ठरू शकतं 'विष'; खाण्यापूर्वी 'या' 3 गोष्टी नक्की लक्षात ठेवा, तुम्ही पण या चुका करता का?



अनेकांना रोज जेवताना कांदा , लिंबू किंवा लोणचं लागतंच. काहींना तर लोणचं एवढं आवडत की ते जेवणासोबत, किंवा कधी भाजी आवडली नाही तर त्या लोणच्यासोबत चपाती किंवा भात खातात.जेवण कितीही साधं असलं तरी बाजूला आंबट-तिखट असं लोणचं नसेल तर जेवण अपूर्णच वाटते. लोणचं केवळ जेवणाची चव वाढवत नाही, तर जेवणाला झणझणीत टच देतो. पण तुम्हाला माहिती आहे का, हेच लोणचं कधी कधी शरीरासाठी विषासारखाही ठरू शकतं. होय, हे चविष्ट लोणचं तुम्हाला नुकसानकारकही ठरू शकतं.लोणचं खाल्ल्याने विषबाधा होऊ शकते

एका हेल्थ एक्सपर्ट यांच्या मते चुकीच्या पद्धतीने साठवलेलं लोणचं खाल्ल्याने विषबाधा झाली होती. तज्ज्ञांच्या मते, लोणचं योग्य रीतीने प्रिझर्व न केल्यास त्यात घातक बॅक्टेरिया वाढू शकतात आणि ते गंभीर आजारांनाही कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे रोज खाण्यातलं असणारं लोणचं इतक घातक ठरू शकेल याचा विचार पण आपण कधी केलाही नसेल. पण खरंच आपण त्याकडे दुर्लक्ष केलं तर त्यामुळे विषबाधा होऊ शकते. लोणचं नीट प्रिझर्व्ह नसेल केला, तर त्यामध्ये 'बोटुलिझम' नावाचा जीवाणू वाढतो. हा जीवाणू टॉक्सिन्स (विषारी द्रव्ये) तयार करतो, जे शरीरात गेल्यास पॅरालिसिससारखा गंभीर आजार होऊ शकतो. काही वेळा हे जीवघेणंही ठरू शकतं. त्यामुळे लोणचं बनवताना आणि साठवताना काही महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेणं अत्यावश्यक आहे.त्या कोणत्या गोष्टी आहेत ते जाणून घेऊयात.

लोणचं साठवताना या गोष्टी लक्षात ठेवा

नेहमी स्वच्छ बरण्यांचा वापर करा : लोणचं साठवताना स्वच्छ आणि स्टेरिलाइज्ड काचेच्या बरण्यांचा वापर करा. काचेची बरणी सर्वोत्तम असते कारण प्लास्टिकमध्ये केमिकल रिस्क असतो आणि मेटलच्या डब्यात रिऍक्शन होण्याची शक्यता असते. म्हणून काचेची बरणी उत्तम पर्याय आहे. पण बरणी वापरण्यापूर्वी गरम पाण्याने ती स्वच्छ धुवा आणि पूर्णपणे कोरडी होऊ द्या.असं केल्याने बॅक्टेरिया किंवा फंगस वाढण्याचा धोका कमी होतो.

लोणच्यामधील तेल आणि व्हिनेगर: लोणच्यामधील तेल आणि व्हिनेगर (सिरका) हे नैसर्गिक प्रिझर्व्हेटिव्ह असतात. पण त्यांचं प्रमाण कमी असेल, तर लोणच्यामध्ये बॅक्टेरिया वाढतात. नेहमी तेलाची पातळी वरपर्यंत राहतेय का हे तपासा.वरचा भाग कोरडा राहिला, तर फंगस लागण्याचा धोका वाढतो.म्हणून नियमितपणे लोणचं पाहत राहा आणि आवश्यक असल्यास तेल किंवा व्हिनेगर वाढवा.हे लक्षण दिसले तर लोणचं लगेच फेकून द्या: जरलोणचं ही भारतीय जेवणातील चविष्ट परंपरा आहे, पण थोडासा निष्काळजीपणा तुमच्या आरोग्याशी खेळ करू शकते. म्हणून पुढच्या वेळी तुम्ही घरी लोणचं बनवा किंवा बाजारातून आणा, तेव्हा स्वच्छता, योग्य साठवण आणि प्रमाणबद्ध तेल-व्हिनेगरचा वापर या तीन गोष्टी नेहमी लक्षात ठेवा.

# कार्तिक पौर्णिमेसाठी कपिलधार सज्ज ;यात्रोत्सवाची जय्यत तयारी पूर्ण

**४ ते ६ नोव्हेंबरदरम्यान होणार धार्मिक उत्सवदेवस्थानकडून घाट परिसरात प्रकाशमान व्यवस्थायात्रेसाठी मांजरसुंबा मार्गाचा वापर करा : एसपी**



बीड (प्रतिनिधी) श्रीक्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमेनिमित्त ४ ते ६ नोव्हेंबरदरम्यान भव्य यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, देवस्थानकडून सर्व तयारी पूर्ण झाली आहे. यंदा कपिलधारवाडी रस्ता बंद असल्याने भाविकांना मांजरसुंबा मार्गे आगमनाचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. यात्रेकरूंच्या सोयीसाठी देवस्थानतर्फे घाट मार्गावर असलेल्या 15 पोलवर फोकस लावून प्रकाशव्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे घाट परिसर व मंदिर विद्युत रोषणाईने उजळून निघाला आहे. वीरशैव लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र कपिलधार येथे संतशिरोमणी श्री मन्मथस्वामी यांची संजीवन समाधी असून, दरवर्षी कार्तिक पौर्णिमेला यात्रोत्सवाचे आयोजन केले जाते. राष्ट्रसंत अहमदपूरकर महाराज यांनी सुमारे सत्तर वर्षांपूर्वी सुरू केलेली ही परंपरा आजही उत्साहात साजरी केली जाते. महाराष्ट्रासह कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातून हजारो भाविक या यात्रेत सहभागी होतात. यंदा 4 ते 6 नोव्हेंबर दरम्यान यात्रोत्सव होणार असून मुख्य कार्यक्रम ५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. या दिवशी दुपारी चार वाजता जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक तसेच शिवाचार्य यांच्या उपस्थितीत संतशिरोमणी मन्मथस्वामी यांच्या संजीवन समाधीची महापूजा करण्यात येणार आहे.

दरम्यान, यात्रेकरूंना सुलभ दर्शन मिळावे म्हणून देवस्थानच्या वतीने मंदिर परिसरात व बाहेरील भागात दर्शनबारीची व्यवस्था केली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने १६ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून, भाविकांसाठी आरओ पाणी, महाप्रसाद, निवास आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मंदिर परिसरात ठिकठिकाणी देवस्थानकडून विशेष ड्रेसकोड असलेले दीडशे स्वयंसेवक, होमगार्डची व्यवस्था केली असून बंकटस्वामी महाविद्यालयाचे 30 एनसीसी गार्ड तैनात राहणार आहेत.

------------प्रशासकीय विभागांशी देवस्थानचा संपर्क

कपिलधार यात्रेच्या पार्श्वभूमीवर तसेच कपिलधारवाडी रस्ता बंद असल्याने देवस्थान पंचकमिटीने जिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस अधीक्षक कार्यालय, बीड ग्रामीण पोलिस स्टेशन, बीएसएनएल, महावितरण आदी विभागांना पत्राद्वारे संपर्क साधून विविध सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. यंदा मांजरसुंबा मार्ग हा एकमेव मार्ग असल्याने होणारी गर्दी लक्षात घेऊन वाहतूक, वीज व दळणवळण या सुविधा सुरळीत राहाव्यात यासाठी सर्व विभागांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

------------

घाट मार्गावर स्टॉल उभारण्यास मनाई

अतिवृष्टीमुळे घाट मार्गावरील काही कठडे ढासळले असल्याने, तसेच रस्ता अरुंद असल्याने गर्दीच्या वेळी धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे व्यावसायिकांनी घाट मार्गावर स्टॉल उभारण्यास मनाई करावी व कपिलधारवाडी रोडवरच आपले स्टॉल लावावेत, असे देवस्थानच्या वतीने बीड ग्रामीण पोलिसांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

------------

घाटमाथ्यावर पार्किंगची व्यवस्था

भाविकांच्या वाहनांची वाढती गर्दी लक्षात घेऊन देवस्थान पंचकमिटीने पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांची भेट घेतली. कॉवत यांनी यात्रोत्सवाचा आढावा घेत पार्किंग व्यवस्थेसाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. तसेच पोलिस बंदोबस्त वाढवून वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी विशेष पथक तैनात केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. देवस्थानकडूनही पोलिसांना सहकार्य करण्यासाठी स्वयंसेवक उपलब्ध करून दिले जातील. घाटमाथ्यावर, मांजरसुंबा परिसरात प्रशासनाने पार्किंगची सोय करण्यात आली आहे.

------------

सुरक्षिततेच्या दृष्टीने मांजरसुंबा मार्गाचा वापर करा : एसपी


श्रीक्षेत्र कपिलधार होणाऱ्या यात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कपिलधारवाडी रस्ता खचल्याने वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बीड यांच्या पत्रानुसार रस्ता असुरक्षित ठरल्याने तो बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मांजरसुंबा मार्गाचा वापर करावा, असे आदेश पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिले आहेत. यात्रेच्या काळात वाहतूक नियमनासाठी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

# विजय साळवे यांच्या कन्येच्या मंगल परिणया प्रसंगी विविध मान्यवरांनी उपस्थिती.

**मंगल परिमिती सोहळा थाटामाटात संपन्न**



माजलगाव / प्रतिनिधीकाल दिनांक 2 नोव्हेंबर रोजी माजलगाव येथील माऊली मंगल कार्यालय येथे रिपब्लिकन सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष विजय दादा साळवे यांच्या



कन्येच्या मंगल परिणय प्रसंगी महाराष्ट्रभरातून राजकीय, सामाजिक, व्यवसायिक, वैद्यकीय कर्मचारी व पाहुणे मंडळी आणि मान्यवरांच्या उपस्थितीत मंगल परिणय सोहळा संपन्न झाला



या प्रसंगी रिपब्लिकन सेना पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष इंदू मिल स्मारक प्रणेते आदरणीय सरसेनानी आनंदराजजी आंबेडकर यांनी देखील उपस्थित राहून नवदाम्पत्याला पुढील वैवाहिक जीवनासाठी मंगल शुभेच्छा दिल्या. सर्वांनी नवविवाहित दांपत्यावर प्रेम, आनंद आणि समृद्धीच्या शुभेच्छांचा वर्षाव केला. मंगल परिणय सोहळा आनंदमय आणि उत्साही वातावरणात संपन्न झाला. उपस्थितांनी विजय साळवे यांचे अभिनंदन करत, नवदांपत्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी मंगलकामना व्यक्त केल्या. या प्रसंगी आनंदराजजी आंबेडकर, माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके, मा.आमदार राधाकिसन होके पाटील, बाबुराव पोटभरे, वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरेश साबळे दयानंद भाऊ स्वामी, सुशीला ताई मोराळे, मा.आ.सय्यद सलीम, पापा मोदी, विजयकुमार वाव्हळ व सर्व पक्षाचे पदाधिकारी नेते मंडळी यांची उपस्थिती होती.

# संभाजी ब्रिगेड स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका लढवणार

केज :-प्रतीनीधी. आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद - पंचायत समिती , महानगरपालिका , नगरपरिषदा , नगर पंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणूका संभाजी ब्रिगेड लढणार असल्याचे सूतोवाच नुकत्याच पार पडलेल्या राज्य कार्यकारणी बैठकी मध्ये संभाजी ब्रिगेड अध्यक्ष ॲड मनोज आखरे यांनी केले आहेत.या अनूषंगाने बिड जिल्हाध्यक्ष राहूल खोडसे यांच्या अध्यक्षतेखाली व संभाजी ब्रिगेडचे प्रदेश कोशाध्यक्ष तथा बिड संपर्कप्रमूख संतोषदादा गाजरे,प्रदेश संघटक अतुल भैय्या गायकवाड,विभागीय अध्यक्ष राहूल वायकर,विभागीय सचीव प्रवीण ठोंबरे, यांच्या प्रमूख मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत निर्णय घेतला असून सर्व जिल्हा पदाधीकारी, तालुका अध्यक्ष यांनी गेल्या अनेक दिवसांपासून या निवडणुकीची तयारी सुरू केली असून शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन अनेक आंदोलने केली आहेत. सरकार शेतकऱ्यांची चेष्टा करत आहे. मराठवाड्यासह महाराष्ट्रा च्या अनेक जिल्ह्यात अतिवृष्टीने कहर केला असून , शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास अस्मानी संकटाने हिरावून घेतला आहे. संभाजी ब्रिगेड ने झोपलेल्या सरकारला जाग करण्यासाठी लक्ष वेध आंदोलन केले. तरीही सरकार झोपेच सोंग करत आहे. पुन्हा संभाजी ब्रिगेड ने सत्ताधरी आमदार खासदार मंत्र्यांच्या घरासमोर जागरण गोंधळ आंदोलन केले मात्र गेंड्याच्या कातडीचे सरकार अजिबात संवेदनशिल होत नाही म्हणून संभाजी ब्रिगेड चे कार्यकर्ते जिल्हा परिषद , पंचायत समिती सह नगर परिषद , नगरपरिषदेत निवडून आणून शेतकऱ्यांचा आवाज बुलंद करून जनतेचे प्रश्न सोडविण्या साठी निवडणुकीला सामोरे जात आहेत. महागाई , बेरोजगारी ने जनता त्रस्त झाली आहे. कापूस , सोयाबीन , कांदा उत्पादन शेतकरी अडचणीत आला आहे. अस्मानी आणि सुलतानी संकटाने पीडलेला बळी राजा कर्ज माफी ची वाट पहात आहे. विधानसभा निवडणुकीत आजच्या सत्ताधारी महायुती सरकारने शेतकऱ्यांचा ७/१२ करा करण्याचा शब्द दिला होता मात्र आता योग्य वेळ शोधत आहेत. महाराष्ट्रात दर दिवसाला ३ शेतकरी आत्महत्या करत आहेत , राज्यात महिला सुरक्षित नाहीत , कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत , सत्ताधारि व विरोधी पक्ष गुंडांच पालन पोषण करण्यात दंग आहेत , आता राजकीय पक्ष म्हणून खऱ्या अर्थाने फक्त संभाजी ब्रिगेडच जनतेचा आवाज होऊ शकते अशी परिस्थिती आहे. या वेळी महाराष्ट्रातील मतदार नक्कीच संभाजी ब्रिगेड ला पसंती देईल असा आम्हाल विश्वास आहे. स्थानिक राजकीय परिस्थिती नुसार समविचारी पक्षां बरोबर युती - आघाडी करून या निवडणूका लढण्यासाठी संभाजी ब्रिगेड सज्ज झाली आहे. या बैठकीत विभागीय उपाध्यक्ष विलास गुंठाळ,जिल्हा अध्यक्ष राहुल खोडसे, मराठा सेवा संघ जिल्हा अध्यक्ष नागनाथ



जाधव, केज तालुका अध्यक्ष जयदीप देशमुख, संभाजी ब्रिगेड जिल्हा सचिव नारायण मुळे, महिला आघाडी जिल्हा अध्यक्ष अस्विनी ताई यादव, तालुका अध्यक्ष सुनंदा ताई लोखंडे संभाजी घोरपडे, तालुका अध्यक्ष आकाश नखाते,गजानन अंबाड जिल्हा संघटक,सचिन साखरे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख,संदीप शितोळे,अभिजित पवार, अजित धपाटे,नानासाहेब हंडीबाग, केशव टेहेरे,मनोज चौधरी, शेखर थोरात, राज तपसे, राहुल रुपदास, महादेव थोरात, संकेत चव्हाण आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ०३ नोव्हेंबर २०२५
https://lokaarambh.com



## कोणती बँक एक वर्षांच्या एफडीवर देते सर्वाधिक व्याज ?







Employee Enrollment Scheme 2025: केंद्र सरकारने लाखो कर्मचाऱ्यांसाठी एक मोठा दिलासा दिला आहे. कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांनी ईपीएफओच्या 73 व्या स्थापना दिनी ( 1 नोव्हेंबर 2025 ) एम्प्लॉयी इनरॉलमेंट स्कीम 2025 ( Employee Enrollment Scheme 2025 ) ची सुरुवात केली आहे. या योजनेचा उद्देश्य काही कारणांनी पीएफ सिस्टीमच्या बाहेर राहिलेल्या कर्मचाऱ्यांना पुन्हा पीएफ योजनेत सहभागी करणे आणि सोशल सिक्युरिटी देणे आहे.

एम्प्लॉयी इनरॉलमेंट स्कीम 2025 कर्मचाऱ्यांना स्वेच्छेने ईपीएफओत सामील करण्यासाठी सुरु करण्यात आली होती. आणि या स्कीम उद्देश्य देशातील जास्तीत जास्त कामगारांना सामाजिक सुरक्षेच्या घेऱ्यात आणणे हा होता. योजनेचा फायदा कोणा-कोणाला ?

या नव्या योजनेंतर्गत एम्प्लॉयर त्या कर्मचाऱ्यांनाही देखील ईपीएफओमध्ये रजिस्टर्ड करु शकतात जे 1 जुलै 2017 ते 31 ऑक्टोबर 2025 च्या दरम्यान कोणा कंपनीशी जोडले गेले परंतू काही कारणांनी EPF स्कीममध्ये सामील केले गेले नाहीत. ही स्कीम 1 नोव्हेंबर 2025 पासून लागू झालेली नाही.

एम्प्लॉयरला जमा करावा लागेल केवळ त्याचा हिस्सा

सरकारने दिलेल्या माहितीनुसार या योजनेत एम्प्लॉयरला ( कंपनी) जर त्यांनी पगारातून आधी पैसे कापले नसतील तर कर्मचाऱ्यांच्या हिश्शांचा मागचे पीएफ योगदान जमा करावा लागणार नाही. तसेच केवळ 100 रुपयांचा नाममात्र दंड भरावा लागेल. एम्प्लॉयरला केवळ त्यांच्या वाटचे योगदान जमा करावे लागणार आहे.

या कर्मचाऱ्यांना मिळणार नाही फायदा

ही योजना त्या सर्व संस्थांना लागू होईल, ज्या वर्तमानात तपासणीच्या घेऱ्यात आहेत, केवळ कर्मचारी हयात असावेत आणि कार्यरत असावेत. परंतू ज्या कर्मचाऱ्यांनी आधीच कंपनी सोडली आहे, त्यांच्या बाबतीत EPFO स्वत: कोणतीही करणार नाही.

EPF ची वेतन सीमा वाढवण्याची तयारी

सरकारच्या या पावलाने देशातील लाखो कामगार भविष्य निधीच्या सुरक्षेशी जोडले जाऊ शकणार आहेत. या सोबत सरकार भविष्यात EPF ची वेतन मर्यादा 15,000 रुपयांवरून 25,000 रुपये करण्याच्याही तयारीत आहे. ज्यामुळे आणखीन कामगारांना याचा फायदा मिळणार आहे.

# चकलंबा पोलीस स्टेशन ने चोरीचा खोटा गुन्हा नोंद करून घेतला

## चकलंबा पोलीस स्टेशन चे एपीआय संदीप पाटील यांना संपूर्ण माहिती असतानाही खोट्या गुन्ह्याची नोंद घेतली.

एसपी कॉवत साहेब असे जर माहिती असतानाही तुमचे पोलीस कर्मचारी चोरीचे खोटे गुन्हे नोंद करीत असतील तर गरिबांनी न्यायाची अपेक्षा कोणापासून करायची ?

जावेद सय्यद अन्य चार जणांना गंभीर जखमी होवुस्तर आठ जणांनी मारले १९ ऑक्टोबर ला सकाळी ८ :१५ वा.मग या हाणामारीत त्यांच्यावर कलम ११८(२) हा गुन्हा नोंद झाला. मग हा रोष मनात धरून या गुन्ह्यातील आरोपींनी दोन दिवसापूर्वीची म्हणजेच १७ऑक्टोबर सकाळी ८वा. चोरी केली म्हणून खोटी केस दि.२५ऑक्टोबर तब्बल आठ दिवसांनंतर चकलांबा पोलीस स्टेशन येथे दाखल केली.

चकलांबा– प्रतिनिधी:गेल्या पंधरा ते सोळा दिवसापासून चकलांबा पोलीस स्टेशन हे सातत्याने चर्चेत आहे.काही दिवसांपूर्वी चकलंबा परिसरात हाणामारी झाली होती. या प्रकरणी पाच–सहा जण जखमी झाले होते.जखमींनी आठ जणांवर गुन्हा नोंद केला होता.त्याचा राग धरून त्या लोकांनी खोट्या स्वरूपाने कट रचून चकलंबा पोलीस स्टेशन मध्ये खोटा गुन्हा दि.२५ऑक्टोबर रोजी नोंद केला आहे . आणि चोरी केली १७ ऑक्टोबरला सकाळी ८वाजता असे फिर्यादीचे म्हणणे आहे.

त्यात विशेष म्हणजे चोरी होऊन आठ दिवसांनी फिर्यादी गुन्हा नोंद करतो, आठ दिवस काय फिर्यादी झोपला होता की काय ? चोरीचा गुन्हा ज्यांच्यावर झाला त्या सर्वांचे मोबाईल लोकेशन चेक करा.व तसेच, फिर्यादीत म्हटले आहे ज्याचे पैसे चोरले तो खुप घाबरा होता म्हणून आठ दिवस तक्रार दिलीं नाही. मग तो आठ दिवसामध्ये पोलीस स्टेशन जवळील बसस्टँड वर ज्याचे पैसे चोरले तो गेला नाही का? त्याचे पण




लोकेशन आणि गावात असणारी सीसी टिव्ही फुटेज तपासावी.खोटा गुन्हा दाखल करणाऱ्याला चांगला चोप द्या. जेणे करून दुसऱ्यांनी असे खोटे गुन्हे कोणी करणार नाही या गुन्ह्याची संपूर्ण चौकशी करून एसपी कॉवत साहेब तुम्ही न्याय द्यावा जर या गुन्ह्यात आरोपी दोषी आढळल्यास आरोपी शिक्षा भोगायला तयार आहे. तुम्हाला विनंती आहे तुम्ही या गुन्ह्याची सखोल चौकशी करावी व तुमच्या पोलिसांची खोटे गुन्हे नोंद करण्याची अद्दल घडवावी.रक्षक जर भक्षक होऊ लागले तर गोरगरिबांचे काय होईल? न्याय कोणाला मागतील संपूर्ण माहिती चकलंबा पोलीस स्टेशनला असतानाही त्यांनी या चोरीच्या गुन्ह्याची एफआयआर नोंद केली ही चोरी झाली होती तर आठ दिवसांनी गुन्हा का नोंदवण्यात आला. ताबडतोब गुन्हा का नोंदवला नाही? तसेच या गुन्ह्या मागे सूत्रधार कोण आहे? याची पण एसपी नवनीत कॉवत साहेब आढावा घ्यावा.व संपूर्ण चकलंबा परिसरात गुप्त चौकशी करा मगच कळेल दूध का दूध पाणी का पाणी.

# बीडच्या नव्या नेतृत्वासाठी एम आय एमकडे अपेक्षेची नजर – वाजेद इनामदार आघाडीवर

बीड प्रतिनिधी

बीड शहराच्या राजकारणात नव्या आशा, नव्या उमेद आणि नव्या दिशेची लाट उसळली आहे. आगामी नगराध्यक्ष निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरभर एकच नाव घुमू लागले आहे – वाजेद इनामदार! प्रत्येक गल्ली, प्रभाग आणि चौकात एका घोषवाक्याचा स्वर ऐकू येतो – “यावेळी बीडच्या विकासासाठी वाजेद इनामदारच हवेत!”तरुणांच्या मनात त्यांनी निर्माण केलेला विश्वास, महिलांशी असलेला जिव्हाळ्याचा संवाद आणि समाजातील प्रत्येक घटकांशी टिकवलेले नाते हे त्यांच्या नेतृत्वक्षमतेचे खरे दर्शन घडवतात. स्वर्गीय मुजीब इनामदार यांनी नगर उपाध्यक्षपदावर असताना दिलेली विकासाची दिशा आणि पारदर्शकतेचा आदर्श आजही लोकांच्या मनात घर करून आहे. आता त्या वारशाला वाजेद इनामदार नव्या विचारांनी आणि जोमाने पुढे नेत आहेत.शहरात बदलाची निर्णायक वेळ आली आहे. रोजगाराच्या संधी, वाहतूक नियोजन, स्वच्छता, नागरी सुविधा आणि स्मार्ट सिटीच्या दिशेने बीडला घोडदौड घ्यायची आहे – आणि हा प्रवास नव्या नेतृत्वाखाली शक्य आहे, असा ठाम विश्वास नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे. वाजेद इनामदार यांच्या प्रत्येक बैठकीत, प्रत्येक संवादात



लोकांचा प्रचंड उत्साह दिसतो. मोमीनपुरा पासून संपूर्ण शहरात त्यांना मिळणारा ओघवता पाठिंबा त्यांच्या लोकप्रियतेचा पुरावा ठरतो आहे.युवक त्यांच्याकडे प्रेरणास्थान म्हणून पाहत आहेत, महिलांना



त्याच्यात परिवर्तनाचा विश्वास वाटतो, तर ज्येष्ठ नागरिक त्यांच्याकडून नव्या बीडचे स्वप्न पाहत आहेत. सर्वांचा एकच सूर उमटू लागला आहे – “बीडच्या नव्या युगाला नेतृत्व द्यायचे असेल, तर वाजेद इनामदारच योग्य!”या उठावदार जनतेच्या भावनेला आता राजकीय स्वर द्यायची वेळ आली आहे. शहरातील मतदार मोठ्या अपेक्षेने म्हणत आहेत – एम आय एम पक्षाने आगामी नगराध्यक्ष निवडणुकीत वाजेद इनामदार यांना अधिकृत उमेदवारी द्यावी! कारण जनता आता बदलाची नाही, तर परिणामकारक नेतृत्वाची वाट पाहत आहे. बीडमध्ये विकास, विश्वास आणि परिवर्तन या तीन आधारस्तंभांवर नव्या युगाची घंटा वाजली आहे – आणि त्या नादात सर्वत्र घुमत आहे एकच हाक – “बीडला हवा आहे, वाजेद इनामदार!”

# मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय कौतुकास्पद - शेतकरी पुत्र तथा भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील

बीड प्रतिनिधी. सध्या केंद्रामध्ये भारतीय जनता पार्टीचे मा श्री नरेंद्रजी भाई मोदी साहेब यांचे सरकार असून देशातील गोरगरीब सर्वसामान्य वंचित लोकांपर्यंत मोठ्या मोठ्या शासकीय योजना कशा पोहोचल्या जातील व त्यांना कसा लाभ मिळवून देण्यामध्ये यशस्वी ठरलेले मा पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी साहेब एक यशस्वी पंतप्रधान म्हणून सध्या जगभरामध्ये ओळखल्या जाऊ लागले आहेत.ते सातत्याने गोरगरीब लोकांना सर्व योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील व यशस्वी मा पंतप्रधान यांनी केलेले प्रयत्न सातत्याने यशस्वी होत.असून केंद्र सरकारच्या बाबतीत सर्वत्र जगभरा मधून कौतुक व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यामध्ये महायुतीचे सरकार असून या महायुतीचे कर्तव्यदक्ष आणि कर्तबदार सर्वांच्या मनामध्ये बसलेले देव देश आणि धर्म यासाठी सातत्याने आपले कर्तव्य पार पाडणारे असे उत्कृष्ट आणि सुसंस्कृत स्वतः वकील असलेले अभ्यासू व्यक्तिमत्व असलेले महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मा मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या बाबतीत येणाऱ्या 2026 मध्ये पूर्णपणे कर्जमाफी करु असे अभ्यासपूर्वक वचन सर्व महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांना त्यांनी दिल्यामुळे शेतकऱ्यांना एक फार मोठा धीर त्यांनी दिला आहे. म्हणून या शेतकऱ्याच्या घेतलेल्या कर्जमाफीच्या निर्णयाच्या बाबतीत मा मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस साहेब यांच्या उत्कृष्ट कार्याचे बीड जिल्ह्यातील शेतकरी पुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी समाधान व्यक्त करून बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने व सर्व बीड जिल्ह्यातील तमाम शेतकऱ्यांच्या वतीने त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी महाराष्ट्रातील तमाम लाडक्या बहिणींसाठी लाडकी बहीण नावाची चांगल्या प्रकारची महाराष्ट्रातील गोरगरीब महिलांना माता भगिनींना एक आधार देणारी योजना सुरू केली आहे. तसेच दिव्यांग व्यक्तीच्या बाबतीत देखील त्यांनी एक हजार रुपये मानधन वाढवले आहे.आता दिव्यांग व्यक्तीला पहिले दीड हजार रुपये मासिक महिना मिळत होता परंतु देवा भाऊ यांनी एक हजार रुपयांची भर या योजनेमध्ये टाकल्यामुळे प्रत्येकी दिव्यांग व्यक्तीला संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून अडीच हजार रुपये महिना मिळू लागला आहे. याबाबतीत देखील महाराष्ट्रातील तमाम दिव्यांग बांधवांमधून देखील समाधान व्यक्त होत असल्याचे या प्रसिद्ध पत्रकाच्या माध्यमातून



शेतकरी पुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे. येणाऱ्या भविष्य काळामध्ये आपण बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील खेड्यापाड्यांमध्ये जाऊन देखील भारतीय जनता पार्टीची शाखा सर्वत्र गावोगाव करणार आहोत.तसेच भारतीय जनता पार्टीचे कार्य देखील आपण सर्वसामान्य माणसांना या शाखा ओपनिंगच्या माध्यमातून सांगणार आहोत. आणि शेतकऱ्यांच्या घेतलेल्या कर्जमाफीच्या योजनेच्या निर्णयाच्या बाबतीत सर्व शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत असून आता पुढेही येणाऱ्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीची सत्ता महाराष्ट्र मध्ये सर्वत्र येईल व भविष्यात लोकहिताचे चांगल्या प्रकारे निर्णय घेणारे अभ्यासू व्यक्तिमत्व असलेले कायमस्वरूपी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देखील देवेंद्र जी फडणवीस साहेब हेच असावेत अशी चर्चा देखील आता सर्व शेतकरी बांधवांमधून होत आहे.असे प्रसिद्धस दिलेल्या पत्रकाच्या माध्यमातून शेतकरी पुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे तसेच रब्बी पिकाचा सर्व बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांनी आपापला विमा काढून स्वतःचा फायदा कसा होईल किंवा शासनाच्या धोरणामध्ये सहभागी होऊन रब्बीचा पीक विमा सर्व बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांनी मुद्दतीच्या आत आपापले पैसे भरावेत विमा काढून घ्यावा घ्यावा असे आवाहन शेतकरी पुत्र तथा भाजप नेते मा नवनाथ जी अण्णा शिरोळे पाटील यांनी केले आहे आणि भविष्यात देवा भाऊ नक्कीच शेतकऱ्यांना रब्बी पीक विमाच्या बाबती देखील विमा कंपनीच्या माध्यमातून भरपूर शेतकऱ्यांच्या हिताची व शेतकऱ्याला आर्थिक मदत करून देतील असा विश्वास ही या वेळी नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी व्यक्त केला व मा श्री देवा भाऊ फडणवीस साहेब यांच्या महायुती सरकारच्या बाबतीत समाधान व्यक्त केले .


# भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल हिंदूरत्न पुरस्काराने सौ.प्रतिमा अरुण काळे सन्मानित.

लोहपुरुष भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंती दिनानिमित्त राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त दिनांक ३१ऑक्टोबर २०२५ रोजी पद्मश्री मणीभाई देसाई मानव सेवा ट्रस्ट,उरळी कांचन तर्फे आयोजित पुरस्कार सोहळा पुण्याच्या राज्यसभेच्या खासदार सौ.मेघाताई कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.तसेच या सोहळ्याचे मुख्य आयोजक डॉ.रविंद्र भोळे व मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. हा सोहळा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह,येरवडा,पुणे येथे भव्य स्वरूपात संपन्न झाला याप्रसंगी प्रथम सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या शुभहस्ते पूजन करण्यात आले.

याप्रसंगी महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १०५ मान्यवरांना ‘भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल हिंदूरत्न २०२५ ‘ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सरस्वती माध्यमिक विद्यालय,आकुर्डी,पुणे ३५ या शाळेच्या शिक्षिका,कवयित्री,





लेखिका,संपादिका,समीक्षिका सौ.प्रतिमा अरुण काळे/ खेमनर यांना भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल हिंदूरत्न पुरस्कार २०२५’ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना त्यांच्या शैक्षणिक ,साहित्यिक,सामाजिक,पर्यावरणीय कार्यासाठी देण्यात आला आहे.या पुरस्काराच्या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवर,मित्रवर्ग,नातेवाईक उपस्थित होते.या सर्वांच्या उपस्थितीत सभागृह तुडूंब भरलेले होते.

# पुढचे 24 तास धोक्याचे ! राज्यात प्रशासनाचा मोठा पाऊस अलर्ट, ..

गेल्या काही महिन्यांपासून सतत कोसळणाऱ्या पावसाने दसरा, दिवाळीतही राज्याला झोडपून काढलं आहे. आता नोव्हेंबर महिना उजाडला, थंडीची चाहूल तर दूरच पण जोरदार पावसाचा इशारा असल्यामुळे घराघरातील छत्र्या अजूनही बाहेरच आहेत. पावसामुळे शेतीचं मोठ्या प्रमाणत नुकसान, पिकं खराब, त्यामुळे दैनंदिन जीवनावरही परिणाम होताना दिसतोय. भारतीय हवामान विभागाने आजही पावासाचा मोठा इशारा दिला असून पुढील काही तास अत्यंत महत्वाचे आहेत. रविवारी राज्यातील अनेक भागांना पावसाने झोडपून काढले असून आज सोमवारच्या दिवशीही बराच पाऊस कोसळू शकतो असा अलर्ट देण्यात आला आहे. आज फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील अनेक भागांताही अतिमुसळधार पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे. अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा कायम असल्याने पुढील काही दिवसही पाऊस असण्याचे संकेत आहेत. मराठवाड्यात रविवारी अनेक ठिकाणी पाऊस झाला. सोमवारी देखील मराठवाड्यातील तीन जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. काही जिल्ह्यांमध्ये




ढगाळ वातावरण झालं आहे. आज बीड, धाराशिव आणि लातूर या तीन जिल्ह्यांत मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. तर राज्यातील इतर भागांतही वेगाने वारे वाहतील, जोरदार पाऊस पडेल. त्यामुळे हवामान विभागाकडून पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे. पुण्यात तीन दिवस पावसाची विश्रांती

पुण्यात तीन दिवस पावसाची विश्रांत होती. शहरात गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने रविवारी विश्रांती घेतली. पुढील तीन दिवस देखील पावसाचे विश्रांती कायम राहणार असल्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे . त्यामुळे पावसाने हैराण झालेल्या पुणेकरांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

थंडीची चाहूल 6 नोव्हेंबरनंतरच

नोव्हेंबर महिना उजाडला तरी राज्यात थंडीचा काही नामोनिशाण दिसत नाहीये. येता जात पडणाऱ्या पावसामुळे सामान्य नागरिक हैराण झाले असून मोठा त्रास सहन करावा लागत आहे. राज्यात थंडीची चाहूल सहा नोव्हेंबरनंतरच लागेल . अरबी समुद्रातील कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यातील काही ठिकाणी 6 नोव्हेंबरपर्यंत हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. 6 ते 8 नोव्हेंबरनंतर हवामान कोरडे होऊन थंडीची चाहूल लागण्याचा अंदाज हवामाना तज्ञांनी वर्तवला आहे.

सप्टेंबर अखेर डेंग्यूचे रुग्ण वाढले

राज्यात सप्टेंबर अखेरीस डेंग्यूचे 9728 रुग्ण आढळले. मुंबईमध्ये रुग्णांचा आकडा सर्वाधिक आहे, मात्र मृत्यूची संख्या घटल्याने दिलासा मिळाला आहे.

# कौतुक करण्यापेक्षा बदनामीच अधिक केली; कर्जमाफीचा मुद्दा आमच्यामुळे जिवंत झालाय-बच्चू कडू

राज्यभरात आमच्या आंदोलनाचं कौतुक करण्यापेक्षा बदनामी अधिक केली जातेय. आम्ही मॅनेज झालो असं बोलताय, लाज वाटत नाही का? शेतकरी आंदोलन बंद करा, असे आमचे कार्यकर्ते म्हणतात. काहीजण मॅसेज करताय त्यांनी ते केल्यापेक्षा आंदोलनात सहभागी व्हा ना. आज आम्हाला आनंद आहे कर्जमाफीचा मुद्दा होता जो संपला होता, तो बच्चू कडूमुळे आज जिवंत झालाय. पण आमच्यावर कमेंट, आरोप आणि टीका करण्यापेक्षा गावा गावात आंदोलन उभं करा ना, अशा शब्दात खडेबोल सुनावत प्रहारचे सर्वेसर्वा बच्चू कडू यांनी विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर दिलंय. आता ८वा वेतन लागू केला, का तर बिहार निवडणूक आहे म्हणून. आम्ही २७ पासून आंदोलन सुरू केलंय. आम्ही मरायला पाहीजे असं काहींना वाटत होतं. अनेकांवर गुन्हे दाखल झालेत. माझ्यावर अनेक गुन्हे दाखल केलेत. कोर्टाचा आदेश आला तर आम्ही जेलभरो करायला सुरुवात केली. पण आमची परिस्थिती दाखवायला मीडिया कमी पडला. अशी खंतही बच्चू कडू यांनी बोलून दाखवली. राज्यात मराठयांचे आंदोलन झाले. ओबीसी आंदोलन झाले. मराठीच्या मुद्दयांवर मोर्चा झाला. हे भावनिक विषय आहे. शेतकऱ्याचा मुद्दा वेगळा आहे. बाकीच्यांची ताकद मोठी आहे. असेही ते म्हणाले. आमचे सात ही नेते आंडूपांडू



आहे का? ३० जून नंतर जर कर्जमाफी नाही झाली तर हंगामाँ होईल. जर कर्जमाफी झाली नाहीतर भाजपला निवडणुकीत मत मारू नका. सरकारने आज कर्जमाफी दिली असती तर, १५-२० कोटीत निपटलं असते. आता ३० जून असल्याने ४५ कोटीच्या वरती आकडा जाईल.मग काय चुकलं.१२ तारखेला अलिबाग याठिकाणी राज्यातील सगळ्या जिल्हा बँकेच्या अध्यक्षांना बोलाविले आहे. दुसरीकडे सत्ताधाऱ्यांची बी टीम माझ्या मागे लागली आहे. माझं घर हवामहल आहे म्हणतात, या पाहायला एकदा आणि पहा. आमचे काय हाल झाले हे आम्हालाच माहीत आहे. असेही बच्चू कडू म्हणाले.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत बीड जिल्ह्याच्या भूमीपुत्रांचे दैदीप्यमान यश

बीड-प्रतिनिधी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या जिल्ह्यातील भूमिपुत्रांचे राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मु ंडे यांनी अभिनंदन केले आहे. जिल्ह्याची मान उंचावणारे तुमचे हे यश आम्हा सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे अशा शब्दांत त्यांनी यशस्वीतांचे कौतुक केले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र शैलेश भिकाराम आंधळे (रँक-०४), प्रकाशकुमार महादेव बडे (रँक-१४), राहुल शिवाजी तांबे (रँक-२६), लक्ष्मण दिनकर गुट्टे (रँक-५६), अजितसिंह मधुकर शिंदे (रँक-५८), रामदास नामदेव चोले (रँक-९०), तेजस भीमाशंकर होनराव (रँक-९८), नितीन भोलाजी खेंगरे (रँक-१३९), श्रीकांत दत्तात्रय होरमाळे (रँक १४०). या सर्वांनी दैदिप्यमान यश संपादित करत घवघवीत यश मिळवले आहे. राज्यपातळीवर आपल्या जिल्ह्याची मान उंचावणारे तुमचे हे यश आम्हा सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. पुढील काळात राज्यातील सर्वसामान्य नागरीकांची सेवा तुमच्या हातून घडणार आहे. सामान्यांच्या समस्या आणि सेवेला प्राथमिकता देऊन आपण राष्ट्रनिर्मितीत भरीव योगदान द्याल हा विश्वास आहे. तुम्हा सर्वांचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा अशा शब्दांत ना. पंकजाताईंनी कौतुक केले आहे.

## डॉ.संपदा मुंडे मृत्यू प्रकरणात एसआयटीची स्थापना


मुंबई-प्रतिनिधी फलटण येथील कर्तव्यावर असणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व बीड जिल्ह्याच्या भूमिकन्या डॉ. संपदा मु ंडे यांच्या मृत्यूप्रकरणी एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. डॉ. संपदा मु ंडे यांच्या मृत्यूप्रकरणी एसआयटी स्थापन करावी अशी मागणी सर्वप्रथम राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मु ंडे यांनी केली होती. त्याच पद्धतीची जनभावनाही होती. या जनभावनेचा आदर करून मुख्यमंत्र्यांनी आज एसआयटीची स्थापना केली आहे. त्याबद्दल पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री यांचे आभार व्यक्त केले आहेत. डॉ. संपदा मु ंडे यांच्या मृत्यू प्रकरणाचा तपास आता वरिष्ठ महिला पोलीस अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालील एसआयटी करणार असुन एसआयटी चौकशीतून निश्चितच डॉ. संपदा मु ंडे यांना न्याय मिळणार आहे. जनभावनेचा सरकारने आदर केला आहे. याचा आपल्याला विश्वास होता असे नमूद करून याबद्दल ना. पंकजाताई मु ंडे यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार व्यक्त केले आहेत. कवडगाव येथे सगळ्यात अगोदर जाऊन पंकजाताई मु ंडे यांनी डॉ. संपदा यांच्या आईवडिलांची व परिवाराची भेट घेऊन सांत्वन केले होते.

## सुप्रिया घुलेंची हायकोर्टात क्लास वन अधिकारी म्हणून निवड

कारखेल खुर्द ता. आष्टी जिल्हा बीड तसं पाहिलं तर ऊसतोडणी मजूर यांच गाव येथील रहिवाशी पोपट घुले गुरूजी सध्या शेवगाव येथे स्थायिक झालेले पोपटराव पंढरीनाथ घुले गुरूजी यांची कन्या सुप्रिया हि वडील आजारी असताना जिद्द, चिकाटी, व मेहनतीच्या जिवावर कठोर परिश्रम घेऊन महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक मिळवत मुंबई उच्च न्यायालयात पी. ए. क्लास वन अधिकारी म्हणून निवड झाल्याने ती सामान्य कुटुंबातील येत असून सातत्याने प्रयत्न करत हे यश संपादन केल्याबद्दल आष्टी तालुका व शेवगाव तालुक्याचा मान उंचावला आहे सुप्रिया घुले या छत्रपती संभाजीनगर जिल्हा न्यायालय गंगापूर येथे स्टेनोग्राफर म्हणून कार्यरत होत्या तसेच आरोग्य विभाग मंत्रालय आणि महत्वाच्या विभागात त्यांची निवड झाली होती मात्र क्लास वन पद मिळवण्याच्या ध्येयाने त्यांचे प्रयत्न सुरू ठेवून अखेर ध्येय गाठले सुप्रियांच्या या यशाने कारखेल खुर्द तसेच आष्टी तालुक्यातील व शेवगाव तालुक्यातील सर्व हितचिंतक, नातेवाईक यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव चालू असून लवकरच तिचा भव्य दिव्य सत्कार त्यांचे जन्म गाव कारखेल खुर्द येथे ठेवण्यात येणार आहे अशी माहिती कारखेल खुर्द चे सरपंच रघुनाथ घुले (शेठ) उपसरपंच लक्ष्मण (पप्पू) घुले, नवनाथ पाटील घुले, गहिनीनाथ घुले, राजू घुले, कैलास घुले, बाबासाहेब गव्हाणे, अशोक वनवे, शहादेव सांगळे, बाळाजी घुले, नामदेव दुकानदार, शिवाजी घुगे मामा, परमेश्वर घुले तसेच मा. सरपंच विश्वनाथ चौधरी, लक्ष्मण पाटील घुले, सचिन घुले, मदन चौधरी, आजिनाथ बर्डे, संजय चौधरी व सुदर्शन घुले सर, गोविंद घुले, प्रा. छगन घुले सर, रामभाऊ घुले सर मेजर कुशल घुले, डॉ. संदिप बांगर, प्रदीप बांगर, भरत चौधरी,आजिनाथ चौधरी सर, शिवाजी खुडे सर, देविदास घुले शेठ, राजेंद्र घुले शेठ प्रकाश घुले, जनार्दन घुले सर, श्रीराम खुडे सर, खुडे गुरूजी व पंचक्रोशीतील बांधव भगिनी यांनी शुभेच्छा देऊन कौतुक केले आहे.

# पुण्यातील त्या थरारक व्हिडीओनंतर धक्कादायक माहिती पुढे, चुलत भावांचा जीव गेला.

पुण्यात पहाटे भीषण अपघाताची घटना घडली. या अपघातानंतर जागीच दोन जणांचा मृत्यू झाला. धक्कादायक बाब म्हणजे सख्ख्या चुलत भावांचा जीव गेला. या अपघाताचा व्हिडीओही पुढे आला असून हा अपघात किती जास्त भयंकर आहे, हे स्पष्ट दिसतंय. काही क्षणात होत्याचे नव्हते झाले. मेट्रो स्टेशनजवळ भरधाव वेगाने कारने खांबाला धडक दिली. अपघाताबद्दल माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पुणे पोलिस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी या अपघाताबद्दल बोलताना म्हटले की, पहाटे 4.55 हा अपघात घडला. मयत दोन्ही मुले पिंपरीची आहेत. जखमी विद्यार्थी एमआयटीच विद्यार्थी असून तो मूळ बीडचा आहे. मोबाईल फोन मिळाले आहेत, तपास सुरू आहे CDR काढत आहोत. गाडीचा नंबर मिळाला आहे, तसा डिटेल्स तपास केल्या जात आहेत. अपघात झाला त्याठिकाणी बिअर बाटली मिळाली आहे, त्याचाही तपास सुरू आहे. मुलांनी अपघाताच्या अगोदर मद्यप्राशन केलं होतं का याचा देखील तपास सुरू आहे. काल रात्री आम्ही पार्टीला जाणार आहोत अस मयत मुलाने त्याच्या आईला सांगितलं होत त्याच अनुषंगाने तपास सुरू आहे. पुण्यातील कोरेगाव पार्क अपघातात सख्ख्या दोन चुलत भावांचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली. मृत ऋतिक भंडारी आणि यश भंडारी हे गाडीत पुढच्या सीटवर बसले होते तर कुशवंत टेकवणी हा गंभीर जखमी झाला. गाडीचा हँड ब्रेक ओढल्याने गाडीचे नियंत्रण सुटले आणि गाडी




मेट्रो स्टेशनच्या सिमेंटच्या पिल्लरला जाऊन धडकली. गाडीचा वेग अधिक असल्याचे सीसीटीव्हीमध्ये दिसून येत आहे. एम.एच. 24 डीटी 8292 गाडी काळ्या रंगाची गाडी असून गाडी भाड्याने घेतल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जातोय. पुणे पोलिसांकडून गाडी नेमकी कुठून आली याचा शोध घेतला जातोय. रस्त्यावरील अनेक सीसीटीव्ही तपासण्याचं काम सुरू केलं आहे. थोड्याच वेळात फॉरेन्सिक टीम अपघातस्थळी दाखल होणार आहे. अपघातातील गाडीत अल्कोहोल किंवा नशाली पदार्थ होते का याची तपासणी केली जात आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com